साक्षीदार क्र. १

**शपथेवर सुरुः—**

**सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील यांच्यातर्फेः—**

४. आरोपीची आमच्या संस्थेत नियुक्ती झाल्यानंतर दि. २८.०८.२०१४ रोजी त्याची लिपिक तथा संगणक परिचालक **(Clerk cum Computer Operator)** म्हणून त्याची नेमणूक करण्यात आली होती. त्याच्या सदरील नेमणूकीच्या कार्यलयीन आदेशाची कार्यालयीन प्रत प्रस्तुत प्रकरणात दाखल असून ती मला आता दाखवण्यात आली. त्यावर श्री. प्रदिप आंबेकर, व्हाईस चेअरमन, रचना संसद, प्रभादेवी, मुंबई यांची स्वाक्षरी नमूद असून ती स्वाक्षरी मी ओळखतो. सदरील आदेश हा **निशाणी क्र. ३०** वर दाखल आहे.

५. आरोपी हा वास्तविकपणे आमच्या संस्थेच्या अनुदानित अभ्यास क्रमाच्या लेखा विषय कामे करण्यासाठी व्यवस्थापनातर्फे विनाअनुदानित आस्थापनेवरुन वेतन घेणारा कर्मचारी म्हणून प्रतिनियुक्तीवर होता. आरोपी हयाच्याकडे आमच्या संस्थेच्या लेखा विभागाची व त्यातील लेखा संदर्भातील सर्व नोंदी अदयावत ठेवण्याची जबाबदारी टाकलेली होती. त्याप्रमाणे दर महिन्याचे पगार पत्र तयार करणे, त्याप्रमाणे धनादेश काढणे, व्हावचर्स तयार करणे, आयकर वजावट केलेली रक्कम चलनाव्दारे भरणे, व्यवसाईक कर याची रक्कम चलनाव्दारे भरणे या सर्व बाबी तयार केल्यानंतर अंतर्गत हिशोब तपासणी झाल्यानंतर धनादेशाव्दारे संबंधित ठिकाणी धनादेशाव्दारे रक्कमेचा भरणा करणे हा देखिल त्याच्या कामाचा भाग होता. सन २०१५ साला पासून आमच्या संस्थेमध्ये संगणकावर टॅलीप्रणालीव्दारे लेखा विषयक कामे केली जाऊ लागली. रचना संसद अॅकेडमी ऑफ आर्किटेक्चर, प्रभादेवी, मुंबई याचे प्रस्तुत प्रकरणातील वादांकित खाते हे स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा प्रभादेवी, मुंबई येथिल असून त्याचा **खाते क्रमांक. ५२००६११००२४** असा आहे. सदरील खाते हाताळण्यासाठी आमच्या संस्थेने गव्हर्निंग कॉन्सिलने ठराव पास करुन संस्थेचे अध्यक्ष, संस्थेचे उप अध्यक्ष व खजिनदार यांच्या स्वाक्षरीने ऑनलाईन

प्रणालीव्दारे संस्थेतर्फे व्यवहार करण्यासाठी आरोपीची नियुक्ती केली होती. सदरील नियुक्ती केल्याबाबतची माहिती त्या ठरावासह बॅकेला पाठविण्यात आली होती. सुरुवातीस सदरील वादांकित बॅक खाते हाताळण्यासाठी आरोपी याचा वैयक्तिक भ्रमणध्वनी कमांक देण्यात आला होता. त्यानंतर संस्थेने विविध महाविदयालयातील ऑनलाईन प्रणाली हाताळण्यासाठी आरोपीस जिओ कंपनीचा भ्रमणध्वनी संच दिला होता. त्याच भ्रमणध्वनीवर बॅकेचे ऑनलाईन प्रणाली हाताळण्याचा ओटीपी येत असे. कालांतराने जिओ कंपनीचा भ्रमणध्वनी संच बंद झाल्याने पुन्हा आरोपीने ऑनलाईन प्रणालीसाठी वैयक्तिक भ्रमणध्वनी कमांक दिला होता.

६. स्टेट बॅक ऑफ इंडियाचा ऑनलाईन बॅकींगप्रणालीमध्ये सीएमपी **(Cash Management Portal)** व्दारे एक अथवा समुहाचे देयके देण्याची सुविधा होती. त्या सुविधेमध्ये देयकांची माहिती एक्सेलशिटमध्ये भरावी लागत असे. एक्सेलशिटमध्ये माहिती भरल्यानंतर समुहाची देयके एकत्रिक व एका रक्कमेव्दारे जमा होत असे. सदरील समुहाचे देयके जमा होताना एकत्रिकरित्या एकाच ओटीपीची आवश्यकता भासत असे.

७. दि. ०६.११.२०२४ रोजी मासिक वेतन देयक जमा करण्यासाठी मी व आरोपी नेहमीप्रमाणे ती तारिख नियोजित असल्याने आम्ही तंत्र शिक्षण संचालनायलय, विभागीय कार्यालय, बांद्रा गेलो होतो. नोव्हेंबर २०२४ च्या पहिल्या आठवडयात दिवाळी असल्यामुळे माहे ऑक्टोबर २०२४ चे मासिक वेतन दि. २९.१०.२०२४ रोजी शासनाच्या आदेशानुसारव्हावे असे आमच्या संस्थेच्या प्राचार्य यांनी आरोपीस सूचना दिल्या होत्या. त्यानुसार दि. २९.१०.२०२४ रोजी काहीच कर्मचा—यांनाच फक्त वेतन अदा करुन इतराना ते देण्यात आले नव्हते. सदरील बाब शिक्षकीय कर्मचा—यांपैकी अदांजे २० कर्मचा—यांनी प्राचार्य व शिक्षक यांच्या संयुक्त व्हॉटसअॅप ग्रुपवर दि. ०६.११.२०२४ रोजी संदेशाव्दारे कळवली. त्या दिवशी आमच्या संस्थेचे प्राचार्य श्री. सुरेश सिंग

(सध्या मयत) हे बॅकेच्या परिसरातच उपस्थित असल्याने ते स्वत: स्टेट बॅक ऑफ इंडिया, शाखा प्रभादेवी येथे गेले. त्यांनी सदरील बॅकेच्या व्यवस्थापकास भेटून दि. २९.१०.२०२४ ते दि. ०६.११.२०२४ या काळावधीतील बॅकेचा वादांकित खात्याचा उतारा मागितला. त्याप्रमाणे बॅकेने तो खाते उतारा प्राचार्य श्री. सुरेश सिंग (सध्या मयत) यांना दिला होता. त्या खातेउताराचो वाचन केले असता त्यामध्ये केवल चार नोंदी आढळून आल्या. त्यापैकी दि. ०१.११.२०२४ रोजी आरोपीने स्वत:च्या खात्यात ३ लाख रुपये वर्ग केल्याची नोंद दिसून आली. सदरील प्रकार पाहून प्राचार्य यांनी तात्काळ मला फोन केला. त्यांनी मला फोन वरुन मी व आरोपी संस्थेमध्ये उपस्थित आहात का अशी विचारणा केली व असाल तर तात्काळ प्राचार्यच्या निजीकक्षामध्ये या असा निरोप दिला. त्यानंतर मी व आरोपी निरोप प्राप्त होताच तात्काळ प्राचार्यांच्या निजीकक्षामध्ये गेलो. प्राचार्यांनी त्यावेळी अशी माहिती दिली की, ब—याच कर्मचा—यांचे माहे ऑक्टोबर २०२४ चे वेतन हे झालेले नाहीत. त्यावेळी माझ्या समक्ष प्राचार्य यांनी प्रज्योत भागवत यास दि. ०१.११.२०२४ रोजीच्या खाते उता—यातील ३ लाखाच्या नोंदी विषयी विचारणा केली. त्यावेळी आरोपीने त्याच पध्दतीने त्याने १५ लाख रुपये काढले असल्याचे सांगितले. सदरील बाबीची शाहनिशा करण्यासाठी आम्ही आरोपीस त्याच्यात लॅपटॉपमधून काढायला सांगितली. सदरील सूचनेनुसार आरोपीने लॅपटॉपमधून खाते उतारा काढला. त्या खाते उताराचे वाचन केले असता दि. १६.१०.२०२४ पासून ते दि. ०१.११.२०२४ या काळावधीत आरोपीने संस्थेच्या अनुदानातील १२ लाख रुपये रक्कम स्वत:च्या बॅक खात्यामध्ये वर्ग केल्याचे दिसून आले. अशी एकूण १५ लाख रुपये रक्कम आरोपीने स्वत:च्या खात्यात वर्ग केल्याचे निष्पन्न झाले.

**(न्यायालयाची दुस—या सत्राची वेळ संपल्याने पुढील कामकाज दिनांक ०६.११.२०२५ पर्यंत तहकूब करण्यात येत आहे. )**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—
**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : ०४/११/२०२५.**